स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र या विषयात पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणा–या शोधप्रबंधाचा संशोधन आराखडा

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक व राजकीय कार्य – एक चिकित्सक अभ्यास

संशोधन आराखडा

संशोधक

श्री. गायकवाड गोरख बाबुराव

एम.ए.नेट राज्यशास्त्र

नायगाव, ता. चाकूर जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. बोरोळे रजनी अनंतराव

कर्मयोगी तुळषीराम पवार महाविद्यालय, हडोळती

ता.अहमदपूर जि. लातूर

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक व राजकीय कार्य – एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :

हा विषय घेउन प्रस्तुत शोध निबंधाची मांडणी करण्यात येणार आहे. शिंदेच्या सामाजिक व राजकीय विचारास सामाजिक शास्त्रात विशेषत : राज्यशास्त्रात अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

आधुनिक महाराष्ट्राची आणि भारताची सामाजिक पुनर्घटन विवेकाच्या आणि न्यायाच्या आधारे करण्याचा प्रयत्न करणा–या मोजक्या विभूतीपैकी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे हे होत ते मूलत : धर्मनिष्ठ पुरूष होते. मात्र उन्नत भूमिकेवरील धर्मकार्य आणि त्यांची दृढ श्रध्दा होती अस्पृश्यता निवारणाचे कार्य हा त्यांचा आयुष्यभर ध्यास होता.

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास महात्मा जोतीबा फुले यांनी अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला युगप्रवर्तक प्रारंभ केला.
विसाव्या शतकाच्या प्रारंभी भारतामध्ये माणुसकीला कलंकभूत असणारा अस्पृश्यतेसारखा एक भयंकर प्रश्न अस्तित्वात आहे, याची फारशी कोणाला जाणीव नव्हती.अशा काळात महर्षी शिंदे यांनी अस्पृश्य मानलेल्या वर्गाची उन्नती करण्याचे व अस्पृश्यता मानलेल्या वर्गाची उन्नती करण्याचे व अस्पृश्यता निवारणाचे कार्य संस्थात्मक प्रयत्नाच्या द्वारा अखिल भारतीय पातळीवर करण्याचा द्रष्टेपणा व कर्तेपणा दाखविला या कामासाठी त्यांनी अतुलनीय स्वार्थत्याग केला,अविश्रांत परिश्रम घेतले.

गेल्या दोन दशकात महाराष्टाचा साक्षेपी वेध घेणा–या अभ्यासकांमध्ये एका गोष्टीविषयी एकवाक्यता आढळते. ती म्हणजे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या असाधारण अशा सर्वगामी कार्याची आपण आजवर केलेली उपेक्षा याचा उलगडा करण्याचा यत्न जाणत्यांनी वेळोवेळी केला आहे. उदा. डॉ. वि. भि कोलते यांच्या मते या उपेक्षेची मीमांसा अनेक दृष्टीनी करता येईल ज्या मराठा समाजात ते जन्मले तो त्यांच्याविषयी उदासीन आहे. त्याला त्याचे समाजासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले त्याला त्याचे महत्त्व कळत नाही आणि राजकारणात ब्राम्हणेतर पक्षाशी सूत न ठेवता ज्या राष्ट्रीय पक्षाला ते मिळाले त्यांची उपेक्षा चालविलेली आहे. वाडमयीन क्षेत्रात महर्षी शिंदे यांची कामगिरी उपेक्षनीय आहे असे नाही पण खास पुण्यात भरलेल्या साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून जेथे दुस–या लेखकांच्या साहित्याचा आवर्जून गौरव केला जातो तेथे महर्षी शिंदेचा नुसता उल्लेखही होत नाही असा प्रत्यक्ष अनुभव आहे .

कर्मवीर शिंदे यांच्या जीवनाचे मर्म व वर्म उलगडताना श्री. रा.ना.चव्हाण यांच्या मते कर्मवीर उपेक्षित राहिले याचे कारण म्हणजे त्यांनी कोणालाच सर्वाशी प्रमाण किंवा सर्वाशी अप्रमाण मुळीच मानले नाही. सत्य हे बहुमतमान्य व लोकमान्य नसते तरी एकाकी होत.

विग्रह घेण्याच्या मागे त्यांची जी मौलिक दृष्टी व स्वतंत्र वागणूक झाली हीच महत्त्वाची ठरते यासाठी जीवनात जबर किंमती द्याव्या लागल्या व त्यांनी त्या दिल्या. हेच त्यांच्या जीवनाचे मर्म व वर्म होय .

न्यायमूर्ती पी.बी.सावंत यांच्या मते महर्षी परंतु त्यांच्या विचारांची आणि तत्त्वज्ञानाची झेप फार उंच आणि लांब पल्ल्याची होती ती समाजाला त्या काळी पेलण्यासारखी नव्हती. समाजाचे नेतृत्व करणा–या माणसाने समाजापुढे नेहमीच असले पाहिजे परंतू त्याने किती पुढे असावे याला मर्यादा असते तो समाजाचा वाटाडा असावा.त्याने दृष्टीक्षेपापलीकडे जाता कामा नये तो तसा गेला तर मार्गदर्शनाचे कार्य संपुष्टात येते. शिंद्याचे जवळ जवळ असेच झाले.

धार्मिक बाबतीत त्यांचे विचार समतेचेच होते असे दिसते. 1903 च्या आंतरराष्ट्रीय धर्मपरिषदेत शिंद्यानी केलेल्या कामगिरीचे यथार्थ वर्णन करण्याच्या बाबतीत डॉ.पवार यांनी कष्ट व दक्षता घेतलेली आहे.

हिंदू धर्माची तत्वे आणि आदर्श पाश्चात्य विद्वानांनी जितक्या मानाने समजून घेतली आहेत.त्या मानाने पाश्चात्य धर्मशास्त्रवेत्यांनी घेतली नाहीत हे शिंदे यांचे एक निरीक्षण आहे.

तसेच हिंदू धर्म म्हणजे प्राचीन काळापासून चालत आलेली एक परंपरा आहे व हल्ली त्याचे शासन आणि नियमन असंख्य जातीचा जो एक मोठा व्यूह बनलेला आहे त्याचे द्वारा होत आहे आणि त्याचा पाया आध्यात्मिक तत्वावर रचलेला आहे हिंदुस्थानमध्ये ज्याचे खरे जुलमी साम्राज्य चालू आहे तो आचार्य उपाध्याय किंवा धर्मग्रंथ हयांच्यापैकी कोणी नसून चालू वहिवाट हीच होय असे शिंदे यांचे दुसरे विधान आहे

21 सष्टेबर 1901 ला शिंदेनी इग्लंडला प्रयाग केले ते 2 वर्षे इंग्लंडमध्ये होते 30 डिसेबर 1901 रोजी शिंद्यानी डोमेस्टिक मिशनपैकी रेव्ह समर्स यांचे जॉर्जेस रो मधील गरिबांचे दु:ख दूर करण्याचे डॉ.पवाराच्या प्रतिपादनानूसार अस्पृश्य मानलेल्या लोकासाठी हया मिशनच्या धर्तीवर संस्था स्थापन करून काम करावे असा विचार शिंद्यांच्या मनात आला ही भेट त्याच्या आयुष्यातील महत्त्वाची ठरली.

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या परदेशातील वास्तव्यात प्रकट झालेली आध्यात्मिक साधना सामान्यजन व समता याबद्दलची कळकळ सौंदर्यबुध्दी समाजशास्त्रीय दृष्टिकोण प्रगल्भता व रसिकता मुख्य म्हणजे स्त्रियांच्या प्रश्नांबदद्ल त्यांनी दाखविलेली आस्था या सर्वाची दखल डॉ.पवारांनी कुशलतेने घेतली आहे.

स्वातंत्रपूर्व काळात त्याच्या तेजस्वी जीवनाच्या ज्योतीतील त्यांच्या व्यक्तिमत्वाचे तितकेच अन्य श्रेष्ट पैलू दृष्टीला आले नाहीत ते डजेडात आणावेत असा हेतू अभ्यासकाचा आहे. देश स्वतंत्र झाल्यानंतर अस्पृश्यता सारखा प्रश्न कायद्यानेच मिटवलेला आहे.पण

स्वातंत्रयपूर्व काळात हा प्रश्न अतिशय भयंकर व उग्र रूप धारण केलेला होता इंग्लंडहून परतताच कर्मवीरांनी क्षणाचीही उसंत न घेता धर्मप्रचारकाच्या प्रार्थना समाज कार्याला निश्चयी व जोरकस सुरूवात केली.

अस्पृश्यांकरता औद्योगिक शिक्षण व्यवस्था हवी असे सुचविणा–या कर्यवीरांनी स्वतःच्या घरात अस्पृश्या बरोबर भोजनादिक व्यवहार केव्हाच सुरू केला होता 20 ऑक्टोबर 1905 च्या भिंगारच्या अस्पृश्य मंडळींच्या रात्रीच्या सभेत अस्पृश्यातानिवारणाच्या कामाकरिता जीवन समर्पित करण्याचा निर्णय कर्मवीरांनी अंतःप्रेरणेतून घेतला.

17,24 व 31 डिसेंबर 1905 च्या सुबोध पत्रिकेत विठ्ठल रामजीनी अस्पृश्यवर्गाच्या उन्नतीसाठी मिशन स्थापण्याच्या आवश्यकते बाबत विस्तृत लेख लिहिले अस्पृश्यतेचा उल्लेख त्यांनी राष्ट्राच्या पाप आणि राष्ट्रीय दुष्कृत्य अशा भेदक शब्दांत केला कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी आपला निर्धार संस्थारूपाने साकार केला 18 ऑक्टोबर 1906 रोजी त्यांनी भारतीय निराश्रित साहयकारी मंडळी डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी ऑफ इंडिया या अखिल भारतीय पातळीवर अस्पृश्योध्दारासाठी कार्य करणा–या संस्थेची स्थापना केली तिचे अध्यक्ष सर नारायण चंदावरकर तर ते स्वत जनरल सेक्रेटरी झाले .

शिंद्यांनी राजकारण कधीही वर्ज्य मानले नाही ब्राम्हणवर्गाची बहुजन समाजाकडे वृत्ती तुच्छतेची व अवहेलनेची होती वेदोक्त प्रकरणात खुद्द श्रीमंत शाहू छत्रपतीना त्याचा चटका बसला महणूनच राजकारणाच्या पातळीवर स्वराज्यवादी तर सामाजिक पातळीवर सनातनी ब्राम्हण धर्माच्या बाजूने असणा–या टिळकपंथीय राजकारणाच्या विरोधात सत्यशोधक शक्ती इंग्रजी सत्तेला प्रतिकूल नसलेले राजकारण राबवू लागली.

सरकारी योजनेनुसार 1920 मध्ये निवडणूका होतील असे जाहीर झाले होते.या योजनेत राखीव जागा असू नये अशी होती हयावेळी जेधे मॅन्शनमध्ये एरव्ही एकमेकांना विरोध करणा–या मराठी राष्ट्रीय संघ आणि अ.भा मराठा लीग हयांनी एकत्रितपणे सभा बोलावली दोन्ही पक्षाच्या मंडळीनी आग्रह केला पण शिंदे यांनी मी राखीव जागेसाठी उभा राहणार नाही त्यातील जातिवाचक तत्वाच्या मी विरूध्द आहे असे ठामपणे सांगितले.

महात्मा गांधी व महर्षी शिंदे यांची अस्पृश्यता निवारणासंबंधी भूमिका यात मतभेद होता अस्पृश्यतानिवारण हे हिंदू धर्माच्या चौकटीत राहूनच हा प्रश्न सोडवला पाहिजे अशी गांधीजीची भूमिका होती तर शिंदेनी प्रमाण मानलेला धर्म हा विवेकनिष्ठ होता म्हणून दोघामध्ये सूक्ष्म मतभेद वेळोवेळी प्रकट होत असत.

1926 ते 32 व्या कालखंडात महर्षी शेतकरी चळवळीतही उत्कटतेने भाग घेत असत अस्पृश्यांची शेतकरी परिषद 1926 पुणे मुंबई इलाखा शेतकरी परिषद 1928 पुणे व हवेली तालुका शेतकरी परिषद 1931 बोरगाव संस्थानी शेतकरी परिषद 1932 तेरदाळ व चंदगड

तालुका शेतकरी परिषद 1932 वडणेर या पाच परिषदामध्ये कर्मवीरांनी भाग घेउन शेतक–यांच्या मध्ये जागृती निर्माण करण्याचे मोलाचे काम केले.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या या ठळक कार्याकडे पाहिल्यास असे दिसून येते की गुलामीच्या काळात फक्त स्वराज्य मिळवणे हेच ध्येय महत्त्वाचे नसून त्याचबरोबर सामाजिक विषमता घालवणे हे महत्तवाचे आहे या शिंद्याच्या विचाराकडे दुर्लक्ष झालेले दिसते यासंदर्भात संशोधन मौलिक चिंतन केलेले असते तरी त्यात आणखी संशोधनाची गरज आहे असे अभ्यासकास वाटते राष्ट्रच्या प्रगतीसाठी समाजसुधारणाही तेवढीच महत्त्वाची बाब आहे असे या शोधनिबंधात अभ्यासकास वाटते.

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक व राजकीय विचार हा संशोधनाचा प्रमुख विषय असला तरी त्याचे धार्मिक व सांस्कृतिक विचारही संक्षिप्त स्वरूपात या प्रबंधात मांडण्यात येणार आहेत.

संशोधन साहित्याचा पुनर्आढावा :

या विषयावर डॉ.गो.मा.पवार यांनी संषोधन केलेले आहे तसेच प्रा.डॉ. अजितानंद जाधव यांनीही संषोधन केलेले आहे.त्याचबरोबर वा.ग.पवार यांनीही संषोधन केलेले आहे महर्शी विठठ्ल रामजी षिंदे याच्या वर देवकते बाळासाहेब नानासाहेब यांनीही संषोधन कार्य केले आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :

प्रस्तुत संशोधनात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या व्यक्तिमत्चाचा सखोल अभ्यास करून मते मांडली आहेत.

इतिहासाचा मागोवा घेतला तर असे दिसते की उपेक्षित विचारवंत आहेत त्यांचे कार्य हे सामाजिक समता आणण्यासाठी होते हे साधार स्पष्ट करून आंबेडकरांच्याही आधी व शाहू महाराजानंतर सामाजिक समता आणण्यासाठी जीवनभर ज्यांनी कार्य केले त्या महर्षी शिंदे यांच्या कार्याचे महत्त्व सामाजिक समता आणण्यासाठी जीवनभर ज्यांनी कार्य केले त्या महर्षी शिंदे यांच्या कार्याचे महत्त्व सामाजिक शास्त्राच्या अभ्यासक, शिक्षक, विद्यार्थी यांना पटवून देण्यासाठी हा विषय निवडला असे मी स्पष्ट करतो महात्मा गांधीपेक्षा त्यांचे विचार कसे अस्पृश्यता संबंधी प्रश्नावर वेगळे होते हे ही स्पष्ट करण्याचा येथे प्रयत्न केला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक व राजकीय कार्य या विषयावर अध्ययनसखोल व सर्वस्पर्शी होउन संशोधनाला निश्चित दिशा प्राप्त करून देण्यासाठी संशोधनाची खालील उद्दिष्टे ठेवण्यात आलेली आहेत.

1) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जीवनपरिचय व त्यांच्यावरील प्रभाव प्रथम स्पष्ट करणे आणि

इतर अभ्यासकांना संशोधकांना तसेच विद्यार्थ्यांना पूरक व मार्गदर्शक ठरेल अशी माहिती संकलित करणे

2) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक व राजकीय विचारांचा आढावा घेणे

3) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे धार्मिक व सांस्कृतिक विचार व कार्य यांचा चिकित्सक अभ्यास करणे

4) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे याच्या राष्ट्रीय स्वातंत्र्य विषयक कार्याचे अध्ययन करणे

5) महर्षी विठ्ठल रामजी शिदे यांच्या विचारांचा तटस्थ व निःस्पृहपणे मागोवा घेणे.

संशोधनपध्दती

महर्षी विठ्ठल रामजी शिदे यांचे सामाजिक व राजकीय कार्य या संशोधन विषयाची मांडणी करत असताना ऐतिहासिक, वर्णनात्मक, विश्लेषणात्मक, विवेचनात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे हे अध्ययन सामाजिक विद्याशाखे अंतर्गत येत असल्यामुळे त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्यावरील संदर्भग्रंथांचा आधार घेण्यात येणार आहे संशोधन हे प्राथमिक व दुय्यम स्तरावर अवलंबून आहे प्राथमिक स्त्रोतात महर्षी विठ्ठल रामजी शिदे यांचे ग्रंथ,'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' माझ्या आठवणी व अनुभव' या ग्रंथांचा अभ्यास केलेला आहे.

तसेचे दुयम स्त्रोतात 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे जीवन व कार्य'– गो.मा. पवार,' महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शोध व बोध'– रा.ना.चव्हाण यांच्या ग्रंथांचा आधार घेतला आहे.

गृहितके

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक व राजकीय विचार एकचिकित्सक अभ्यास या विषयावर प्राथमिक अभ्यासाच्या अवलोकनातून गृहितकांचा अभ्यास करण्यात येईल.

1) महर्षी विठ्ल रामजी शिंदे हे समाजसुधारक व अष्टपैलू व्यक्तिमत्व होते हे कसे ते शोधण्याची गरज आहे.

2) शिंदे यांनी व्यापक प्रमाणात सामाजिक व राजकीय विचार मांडले.
3) त्यांनी मांडलेल्या सांस्कृतीक मूल्यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.
4) शिंदेनी मांडलेले राष्ट्रीय स्वातंत्र्य विषयक विचार महत्त्वपूर्ण आहेत.
5) आजच्या काळात महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या समग्र विचारांची गरज आहे.

संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनाचे क्षेत्र महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक व राजकीय विचार यांचा अभ्यास करणे एवढे आहे.हाच संशोधनाचा गाभा असणार आहे.

संशोधनाची विश्लेषणात्मक पध्दती स्वीकारून महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा आढवा घेण्यात येणार आहे.

संशोधनाचा आराखडा

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक व राजकीय विचार एक चिकित्सक अभ्यास या विषयावर संशोधन होण्यासाठी शोधप्रबंधाचा आराखडा खालील पाच प्रकरणांच्या आधारे मांडण्यात येणार आहे.

प्रकरण 1 ले
प्रस्तावना :

प्रस्तावनेच्या पहिल्या प्रकरणात संशोधन पद्धतीची मांडणी करून विषय प्रवेश संशोधकाची विषय निवडी मागची भूमिका, अध्ययनाचे महत्त्व त्यासाठी स्वीकारण्यात आलेली उद्दिष्टे आणि अध्ययनाचा संपूर्ण गाभा निश्चित करून व्याप्ती स्पष्ट केली जाईल.

प्रकरण 2 रे
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जीवनपरिचय व प्रभाव

या प्रकरणामध्ये वि.रा शिंदे हे एक क्रांतिकारक व अष्टपैलू व्यक्तिमत्व कसे होते त्यांचे शिक्षण बालपण या सर्व मुद्यांच्या अनुषंगाने त्यांचा जीवनपरिचय व त्यांच्यावर पडलेला प्रभाव यांचा अभ्यास यात केला जाईल.

प्रकरण 3 रे
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे सामाजिक विचार

या तिस–या प्रकरणात सामाजिक विषमते संदर्भातील विचार तसेच कार्य यांचा आढावा घेणे यात अस्पृश्यता निवारणाच्या कार्यासाठी स्थापन केलेली संस्था व कार्य डिप्रेस्ड क्लास

मिशन अभ्यासणे अस्पृश्य समाजाचे परिवर्तन करणे सार्वजनिक धर्माची शिकवण देणे या कार्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण 4 थे
महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे राजकीय विचार

या प्रकरणात राजकीय विचार व कार्य काय केलेले आहेत याचा मागोवा घेण्यात येईल राष्ट्रीय चळवळीतील सविनय कायदेभंगात सहभाग व शिक्षा, अखिल भारतीय दलित संघ, भारतीय युवक कृषक समाज तसेच निवडणुकीतील सहभाग व आर्थिकदृष्टया गांजलेल्या बहुजन समाजासाठी व बहुसंख्य मराठा समाजाची राष्ट्रीय स्वात़ंत्रयाची आकांक्षा सिध्द करण्यासाठी राजकारण केले तसेच बहुजनपक्षाची स्थापना करून राजकीय विचार मांडले.

प्रकरण 5 वे
महर्शी षिंदे यांचे स्त्री विशयक विचार

या प्रकरणात महर्शी विठठ्ल रामजी षिंदे यांनी स्त्रियांची स्थिती व गती बदद्लचे विचार मांडले आहेत. यात मुलांबरोबरच मुलींना षिक्षण प्राप्त व्हावे , मुलींना अनीतीच्या खाईत दुश्ट चालीपासून संरक्षण करावे यासाठीचे कार्य विषद करण्यात आले आहे. यात मुलींना प्राथमिक षिक्षण सक्तीचे करावे, असाही विचार यात आला आहे.

प्रकरण 6 वे
निष्कर्ष

हे या संशोधन प्रबंधाचे शेवटचे प्रकरण आहे. संशोधन अहवालाच्या प्रकरणात जे निष्कर्ष हाती येतील, त्याचा मागोवा घेण्यात येणार आहे.प्रामुख्याने संशोधनाची दिशा ठरविण्यासाठी मांडण्यात आलेल्या गृहितकांची सिध्दता तपासली जाईल.

परिशिष्टे

1 फोटो
2 संदर्भग्रंथ
3 मासिके व नियतकालिके

संदर्भ सूची

1) 'भारतीय अस्पृष्यतेचा प्रश्न – महर्षी विठठ्ल रामजी षिंदे

2) 'माइ–या आठवणी व अनुभव' – महर्षी विठठ्ल रामजी षिंदे

3) 'महर्षी विठठ्ल रामजी शिंदे ' – रा. ना.चव्हाण

4) एक उपेक्षित महामानव – वा.ग.पवार
महर्षी विठठ्ल रामजी षिंदे

5) महर्षी विठठ्ल रामजी शिंदे समग्र वाड्मय खंड 1 ला
भारतीय अस्पृष्यतेचा प्रश्न संशोधन आणि चिंतन संपादक – गो.मा.पवार

6) महर्षी शिंदे ह.कि तोडमल

7) महर्षी विठठ्ल रामजी शिंदे डॉ.नीला पांढरे

8) महर्षी विठठ्ल रामजी शिंदे यांचे सामाजिक आणि राजकीय विचार
प्रा.डॉ.अजितानंद जाधव

9) महर्षी विठठ्ल रामजी षिंदे डॉ.गो.मा.पवार

10) एक उपेक्षित महात्मा महर्शी विठठ्ल रामजी शिंदे प्रा.डॉ.एन डी.पाटील

11) The Life & works of Maharshi Vitthal Ramji Shinde G.M. Pawar

संशोधक

श्री गायकवाड गोरख बाबुराव
एम.ए. नेट राज्यशास्त्र
नायगांव. ता.चाकूर जि.लातूर.

.

मार्गदर्शक

प्रा. डॉ. बोरोळे रजनी अनंतराव
कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय, हडोळती
ता.अहमदपूर जि.लातूर